| MHKO070006512024 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.९२/२०२४ मधील नि.क्र.२३ वरील आदेश (अशोक थोरवत आणि इतर -विरुध्द- प्रकाश थोरवत आणि इतर)</u>** |
|---|---|

०१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२अ यांनी त्यांची प्रतिवादी क्र.२ब तर्फे नेक्स्ट फ्रेंड म्हणुन नेमणुक करुन सदरचे काम पुढे चालविण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.२अ यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द वाटपाचा व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. यातील प्रतिवादी क्र.२ब हा मनोरुग्न असुन त्याचेवर रत्नागिरी मनोरुग्नालय, रत्नागिरी येथे उपचार सुरु असुन त्याबाबत मे.ज्यु.मॅ.वर्ग १, जयसिंगपूर यांचे कोर्टात क्रि.कि.अर्ज नं.१५/२०२१ ने अर्ज दाखल केला होता. सदर प्रतिवादी क्र.२ब हा मनोरुग्न असले कारणाने त्याला चांगले वाईट परिणामाची कोणतीही जाणीव नाही. तसेच त्याला स्वत:चे हित अहित कळत नाही. त्यामुळे सदरचे कामी त्यास मे. कोर्टात हजर ठेवणे, काम चालविणे अशक्य ठरले आहे. यातील प्रतिवादी क्र.२अ या प्रतिवादी क्र.२ब च्या नात्याने आई असुन त्या आजतागायत प्रतिवादी क्र.२ब चा सांभाळ करीत आहेत. तसेच त्यांच्या सर्व दैनंदिन गरजा यातील नेक्स्ट फ्रेंड म्हणजेच प्रतिवादी क्र.२ या पुरवित आलेल्या आहेत. तसेच प्रतिवादी क्र.२ब यांची संपुर्ण देखभाल, दैनंदिन गरजा, कपडेलत्ता, औषधोपचार वगैरे यातील नेक्स्ट फ्रेंड यांनीच केलेली आहे. त्यामुळे यातील नेक्स्ट फ्रेंड यांना सदरचा दावा प्रतिवादी क्र.२ब करीता चालविणे आवश्यक बनले आहे.

०३. प्रतिवादी क्र.२अ पुढे असे कथन करतात की, प्रस्तुत प्रतिवादी क्र.२अ या प्रतिवादी क्र.२ब रमेश विलास थोरवत यांचे नेक्स्ट फ्रेंड म्हणुन काम करणेस तयार आहेत. या दोघांचे हक्कही परस्पर पुरक असुन एकमेकांविरोधी नाहीत त्यामुळे प्रतिवादी क्र.२अ श्रीमती गंगुबाई विलास थोरवत यांची या कामी प्रतिवादी क्र.२ब रमेश विलास थोरवत यांचेकरीता नेक्स्ट फ्रेंड म्हणुन नेमणुक करुन सदर दाव्याचे काम पुढे चालावे म्हणुन सदरचा अर्ज दाखल करुन काम चालविणेस परवानगी मागीतली आहे.

०४. वादीतर्फे सदर अर्जास असे म्हणणे देण्यात येते की, सदर प्रतिवादी क्र.२ब याचेविरुध्द मे. कोर्टाने दि.२३/०८/२०२४ रोजी एक्सपार्टीचा हुकूम केला आहे. अशा स्थीतीत सदरचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नाही. सदर प्रतिवादी क्र.२ब हा मनोरुग्न

असलेबाबत रत्नागिरी येथे उपचार चालू असलेबाबत अर्जात नमुद केले आहे. परंतू त्याबाबतची कोणतीही कागदपत्रे मे. कोर्टात हजर केली नाहीत. सबब प्रतिवादी काम लांबविण्याच्या प्रयत्नात असल्याने सदरचा खोटया मजकुराचा अर्ज दिला आहे. तसेच प्रतिवादी क्र.२अ, २ब चा बेलिफ रिपोर्ट दि.०९/०५/२०२४ इ. रोजीचा पाहिल्यास प्रतिवादी क्र.२अ यांनी असे म्हणटले आहे की, प्रतिवादी क्र.२ब हा माझा मुलगा असुन तो कामानिमित्त बाहेरगावी गेला आहे. असे बेलिफ रिपोर्टमध्ये नमुद केले आहे. त्यामुळे सदरचा प्रतिवादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन केले, युक्तीवाद ऐकला. सदरचे प्रकरण दावा वाटपाकरिता व कायम मनाई ताकीदीबाबत दाखल केलेले दिसुन येते. प्रतिवादी यांनी नि.२६/१ सोबत फौजदारी किरकोळ अर्ज नं.१५/२०२१ मधील आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. सदर आदेशाची प्रत पाहिली असता रमेश विलास थोरवत हा मानसिक आजारी असल्यामुळे त्याला दि.१६/०२/२०२१ रोजीच्या मे.कोर्टाच्या आदेशाप्रमाणे उपचारासाठी प्रादेशिक मनोरुग्नालय, रत्नागिरी येथे पाठविले होते हे दिसुन येते. सदरचा आदेश होवुन चार ते पाच वर्षे होवुन गेलेली आहेत. रमेश विलास थोरवत याचेबाबत सध्याचे कोणतेही वैद्यकीय कागदपत्रे प्रतिवादी यांनी हजर केलेले नाहीत. तसेच रमेश विलास थोरवत यालादेखील मे. कोर्टात हजर ठेवले नाही. नि.८ वरील बेलिफ रिपोर्टवरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.२ब रमेश विलास थोरवत हा कामानिमित्त बाहेरगावी गेले असल्याने सायंकाळी घरी परत येणार असल्याचे खात्रीशीर सांगुन प्रतिवादी क्र.२अ गंगुबाई थोरवत यांनी प्रतिवादी क्र.२ब करिता आई या नात्याने नोटीस स्वीकारल्याचे दिसुन येते. प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र.२ब हा सध्या मनोरुग्न असल्याबाबत डॉक्टरांचे वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. वरील परिस्थीतीचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**- आदेश -**

१. प्रस्तुतचा अर्ज (नि.क्र.२३) नामंजूर करण्यात येतो.

VANITA Digitally signed by VANITA Date: 2026.04.04 17:32:24 +0530

**(व्ही. एम. कोळेकर )**

दि.०२/०४/२०२६.

३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
जयसिंगपूर.